**पटकी नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग), पुणे-१ कार्यालयातील ३ अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः साथरो-२०२५/प्र.क्र. ६०/संसआ-२**

१० वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल इमारत,
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
दिनांक: ०२ एप्रिल, २०२६

वाचा -

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.-पदआ-२००७/प्र.क्र.११७/सेवा-१, दिनांक ०६.०८.२००७.

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.साथरो-२०२५/प्र.क्र.६०/संसआ-२, दि.१८.०९.२०२५

३) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.,दि. २८.०२.२०२६.

४) सहसंचालक, आरोग्य सेवा (प्रशासन), मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/आस्था/कक्ष ५५क/पटकी नियंत्रण/३ अस्थायी पदे/१९३७-३८/२०२६, दि.२४.०३.२०२६.

प्रस्तावना:-

सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग), पुणे -१ या कार्यालयातील पटकी नियंत्रण कार्यक्रमांतर्गत येथे कार्यरत असलेली खाली नमूद केलेली ३ अस्थायी पदे सार्वजनिक आरोग्य विभागाने मंजुरी दिलेल्या सुधारित आकृतीबंधातील मंजूर पदे आहेत. सदर ३ अस्थायी पदांना सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.साथरो-२०२५/प्र.क्र.६०/संसआ-२, दि.१८.०९.२०२५ अन्वये दि.०१.०९.२०२५ ते दि.२८.०२.२०२६ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मंजूरी देण्यात आली होती. सहसंचालक, आरोग्य सेवा (प्रशासन), मुंबई यांच्या संदर्भ क्र.४ येथील प्रस्तावानुसार पटकी नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कार्यरत असलेली सदर ३ अस्थायी पदे पुढे चालू ठेवणे राज्यातील जनतेस आरोग्य विषयक सेवा सातत्याने उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आवश्यक असल्याने, सदरहू ३ अस्थायी पदे दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ पर्यंत पुढे चालू ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

पटकी नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग), पुणे-१ या कार्यालयाच्या अधिनस्त कार्यरत असलेल्या ३ अस्थायी पदांना

दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजुरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | तात्पुरते पद प्रथम निर्माण केलेल्या शासन निर्णयाचा क्रमांक व दिनांक | अस्थायी पदांची संख्या | ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक (आरोग्य पर्यवेक्षक) (गट-क) | साआवि, शा.नि.क्र. ईडीए-१०८५/ सीआर-३५/आरोग्य-६, दि.२३/८/१९८५ | १ | पीबी-२ (९३००-३४८००) + ग्रेड पे ४२०० |
| २ | लिपिक-नि-टंकलेखक (गट-क) | साआवि, शा.नि.क्र. ईडीए-१०८५/ सीआर-३५/आरोग्य-६, दि.२३/८/१९८५ | १ | पीबी-१ (५२००-२०२००) + ग्रेड पे १९०० |
| ३ | चतुर्थश्रेणी कर्मचारी (गट-ड) | साआवि, शा.नि.क्र. ईडीए-१०८५/ सीआर-३५/आरोग्य-६, दि.२३/८/१९८५ | १ | पीबी-१ (४४४०-७४४०) + ग्रेड पे १३०० |
| एकूण | | | ३ | |

२. सदर पदांवरील खर्च खालील लेखाशिर्षातून खर्ची घालण्यात यावा आणि हा खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

**मागणी क्र. आर-१**

२२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य,

०६- सार्वजनिक आरोग्य,

१०१-रोग प्रतिबंधक व नियंत्रण

(०१) रोग प्रतिबंधक व नियंत्रण

(०१) (०६) पटकी नियंत्रण कार्यक्रम,

(सांकेतांक -२२१० ०६२९) (अनिवार्य)

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या, दि.२८.०२.२०२६ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. उपरोक्त अस्थायी पदांना मुदतवाढ दिलेल्या कालावधीत वित्त विभागाच्या दि.२८.०२.२०२६ रोजीच्या शासन निर्णयातील

निर्देशानुसार सदर पदे ही सेवार्थमध्ये असल्याची खातरजमा करावी व पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४०२११२०१११८१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHOK SAUNDAJI KAYANDE

Digitally signed by ASHOK SAUNDAJI KAYANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=E8A148F20AC4452CCA38F82A2D8DA98A25BCD6C0593B3C922FB9350133146D2A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=05AA2DA5646942EDAA700CF0373625004877939054FDE4112AEA5CFDF5E9236D, cn=ASHOK SAUNDAJI KAYANDE
Date: 2026.04.02 13:10:07 +05'30'

**(अशोक कायंदे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा) ( लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा, आयुक्तालय, मुंबई/पुणे.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) मुंबई.
५. सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग), आरोग्य सेवा आयुक्तालय, पुणे.
६. उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे.
७. लेखा व कोषागार अधिकारी, मुंबई.
८. निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
९. जिल्हा कोषागार अधिकारी ,पुणे.
१०.वित्त विभाग व्यय-१३, अर्थसंकल्प-३, अर्थसंकल्प-९, आ.पु.क., मंत्रालय, मुंबई.
११.सार्वजनिक आरोग्य विभाग, अर्थसंकल्प व लेखा / सेवा-२, मंत्रालय, मुंबई.
१२.निवडनस्ती (संसआ-२).